**महाराष्ट्र शासन**

**समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१.**

दूरध्वनी क्र .०२०-२६१२२७५२ ईमेल –sakalyanpuneest@gmail.com

| | | |
|---|---|---|
| वाचा क्र- | १) | सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना सेवाजेष्ठता नियमावली दिनांक २१.०६.२०२१ |
| | २) | शासन पत्र क्र. सकआ-२०२२/प्र.क्र.१२५/आस्था २ दिनांक ३०.०३. २०२३ |
| | ३) | आयुक्तालयाचे आदेश क्र. ८०५८६५ / ८०५८७० दिनांक १७.०१.२०२५ |

जाक्र. सकआ/ का-६/आस्था-७/कलि/तात्पुसेजे/२०२४-२५

## आदेश

समाज कल्याण आयुक्तालयांतर्गत कार्यरत असलेल्या “ **कनिष्ठ लिपीक** ” या संवर्गातील कर्मचाऱ्यांची **दिनांक १.०१.२०२४ व दिनांक १.१.२०२५** रोजीची **तात्पुरती सेवाजेष्ठता यादी** प्रसिद्ध करण्यात येत आहे.

या तात्पुरत्या सेवाजेष्ठता यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या नावांची आद्याक्षरे, आडनाव, जन्मतारीख, नियुक्तीचा दिनांक, सलग सेवेचा दिनांक, जातीचा प्रवर्ग, दिव्यांग प्रवर्ग नोंद या विषयाच्या वास्तविक त्रृटी व सेवाजेष्ठता यादीबाबत काही आक्षेप असल्यास त्याबाबतची अभिवेदने ही तात्पुरती सेवाजेष्ठता यादी **प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत** आयुक्तालयाकडे संबंधित कर्मचारी ज्या कार्यालयात कार्यरत आहे त्या कार्यालयामार्फत सादर करावे. या कालावधीनंतर प्राप्त झालेली अभिवेदने विचारात न घेता अंतिम सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सर्व प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग स्तरावरून सेवाजेष्ठता यादी अधिनस्त कार्यालयांना पाठविण्यात यावी. कार्यालय प्रमुखांनी उपरोक्त सेवा जेष्ठता यादी सर्व संबंधिताच्या विहित मुदतीत निदर्शनास आणून देण्याबाबत दक्षता घेण्यात येऊन त्याची पोच कार्यालयीन दप्तरी ठेवावी.

Signed by Om Prakash Bakoria
Date: 25-02-2025 15:29:50

**(ओम प्रकाश बकोरिया)**
**आयुक्त समाज कल्याण**
**महाराष्ट्र राज्य पुणे.**

प्रतिलिपी माहितीस्तव सस्नेह अग्रेषित:-

मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव:-

१. उपायुक्त दिव्यांग कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे.
२. उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे.
३. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व).
४. उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती(सर्व)
५. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
६. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
७. शाखा प्रमुख, समाज कल्याण आयुक्तालय पुणे (सर्व).